|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

जा.क्र.कबचौउमवि/०६/प्रवेश व पात्रता विभाग/५३/२०२४ दि.२६.०६.२०२४

**परिपत्रक क्र. १५ / २०२४**

**प्रति,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी, संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा.संचालक तसेच शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांचे मा.संचालक, विभागप्रमुख यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रो-रेटा अंतर्गत "**अश्वमेध**" फी रु.३०/- ऐवजी रु.३६/- आकारण्याबाबत.

**संदर्भ :-** प्रवेश व पात्रता विभागाचे परिपत्रक ३०/२०२२ (शुध्दीपत्रक) जा.क्र.कबचौउमवि/०६/ प्र.पा./८२/ २०२२, दि.०५.०७.२०२२.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा / विभागांमध्ये फी लागू करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भीय परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ आणि शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांकडून प्रो-रेटा अंतर्गत "**अश्वमेध**" या अर्थ शिर्षाखाली **रु.३०/-** आकारण्यात आले आहे.

तद्नंतर मा.अवर सचिव, राजभवन, मुंबई यांचे दि.१५ जून २०२३ रोजीच्या सल्लागार समितीच्या सभेतील सभावृत्तात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयांकडून प्रो-रेटा शुल्क ( इंद्रधनुष्य, क्रिडा महोत्सव अविष्कार व आव्हान) **रु.३०/- ऐवजी रु.३६/-** आकारण्यात यावे असे कळविण्यात आले आहे.

वरील बाब लक्षात घेता, मला प्राप्त झालेल्या आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांकडून "**अश्वमेध**" अंतर्गत **रु.३०/- ऐवजी रु.३६/-** प्रो-रेटा फी आकारण्या यावी.तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून "**अश्वमेध**" ऐवजी "**क्रीडा महोत्सव**" या अर्थ शिर्षाखाली शुल्क आकारावयाचे असल्याने कृपया या बदलाची नोंद घ्यावी.

तरी सदरची बाब महाविद्यालयांमधील प्रवेशीत विद्यार्थी तसेच अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक आणि कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

राजेश चि.टाकरे

**( सहायक कुलसचिव )**

प्रवेश व पात्रता विभाग

**प्रत माहितीसाठी :**

१.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव. २.मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगांव.
३.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगांव.४.मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
५. मा. क्रिडा संचालक, कबचौउमवि, जळगांव. ६. मा.संचालक, विद्यार्थी विकास, कबचौउमवि, जळगांव.
७. मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि, जळगांव. ८. समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव.